दै. प्रजावाणी दि. २९।१०।२४

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीला जेरबंद

## पिस्तूलसह घातक शस्त्र जप्त

प्रतिनिधी • नांदेड





जिल्ह्यातील उस्मानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला उस्माननगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार व त्यांच्या टीमने सिनेस्टाईल पाठलाग करून सहापैकी दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. मात्र अंधाराचा फायदा घेऊन चार आरोपी पसार झाले. पकडलेल्या दोघांकडून पोलिसांनी एक पिस्तूल, दोन जिवंत काडतुस, तीन मोबाईल, एक बाईक, दोन तलवार आणि दोरी असा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई २७ ऑक्टोबरच्या पहाटे तीनच्या सुमारास उस्माननगर रस्त्यावर केली.

जिल्ह्यातील उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार व त्यांचे सहकारी पोलीस उपनिरीक्षक सुनील सूर्यवंशी, गजानन गाडेकर, अंमलदार अनिरुद्ध दाढे, मगदूम शेख हे गस्त घालत होते. यावेळी त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, नांदेड ते उस्माननगर ते कलंबर रस्त्यावरील बामणी फाटा येथे रस्त्यावर दरोडा टाकण्याच्या तयारीत काही चोरटे दबा धरून बसल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने एपीआय पवार यांनी ही माहिती आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगून आपल्या सहकाऱ्यांसोबत सापळा लावला. पोलीस आपल्याला पकडण्यासाठी येत असल्याची चाहूल चोरट्यांना लागताच काहीजण काही पायी तर काही दुचाकीवरून पळ काढण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्यांच्यावर झडप घातली आणि दोघांना दुचाकीवरून खाली पाडून ताब्यात घेतले.

मात्र चार जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. यावेळी प्रदीपसिंग विजयसिंग खालसा (वय २४ राहणार यात्री निवास परिसर नांदेड) आणि ओमकार शेषराव मुदीराज (वय २३ राहणार सखोजीनगर नांदेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून एक पिस्तूल, दोन जिवंत काडतुस, तीन मोबाईल, एक बाईक आणि लहान मोठ्या दोन तलवारी तसेच नायलॉन दोरी, मिरची पावडर असे घातक साहित्य जप्त केले. त्यांची अधिक विचारपूस केली असता त्यांनी काही ठिकाणी गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. लवकरच उर्वरित पसार झालेले चार आरोपी पोलीस पकडतील असा विश्वास एपीआय श्री पवार यांनी व्यक्त केला. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक सुनील सूर्यवंशी यांच्या फिर्यादीवरून उस्माननगर पोलीस ठाण्यात प्रदीपसिंग खालसा आणि ओमकार मुदीराज या दोघांसह इतर चार जणांविरुद्ध दरोड्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पथकाचे परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांनी कौतुक केले.

दै. गोदातीर

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीला अटक; पिस्तूलसह घातक शस्त्र जप्त



**नांदेड–** जिल्ह्यातील उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला उस्माननगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार व त्यांच्या टीमने सिनेस्टाईल पाठलाग करून सहापैकी दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. मात्र अंधाराचा फायदा घेऊन चार आरोपी पसार झाले. पकडलेल्या दोघांकडून पोलिसांनी एक पिस्तूल, दोन जिवंत काडतुस, तीन मोबाईल, एक बाईक, दोन तलवार आणि दोरी असा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई २७ ऑक्टोबरच्या पहाटे तीनच्या सुमारास उस्माननगर रस्त्यावर केली.

जिल्ह्यातील उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सहायक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार व त्यांचे सहकारी पोलीस उपनिरीक्षक सुनील सूर्यवंशी, गजानन गाडेकर, अंमलदार अनिरुद्ध वाढे, मगदूम शेख, श्री रेजीतवाड, शिवपुजे, कुबडे हे गस्त घालत होते. यावेळी त्यांना काही चोरटे दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा लावून झडप घातली असता त्यांनी दोघांना दुचाकीवरून खाली पाडून ताब्यात घेतले. मात्र चार जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. यावेळी प्रदीपसिंघ विजयसिंघ खालसा (वय २४, रा.यात्री निवास परिसर नांदेड) आणि ओमकार शेषराव मुदीराज (वय २३ रा. सखोजीनगर, नांदेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून एक पिस्तूल, दोन जिवंत काडतुस, तीन मोबाईल, एक बाईक आणि लहान मोठ्या दोन तलवारी तसेच नायलॉन दोरी, मिरची पावडर असे घातक साहित्य जप्त केले. या प्रकरणी उस्मानगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.